Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 12 – 15
DOI: 10.5281/zenodo.10071332

**Original Research Article**

# म. गांधी प्रणित सत्याग्रह : सर्व सामान्य जनतेच्या मनात स्वातंत्र्याची आस जागवणारा सनदशीर मार्ग

प्रा. डॉ. शिवराज पाटील

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद ता. अहमदपूर, जि. लातूर. ४१३५१५ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: shivraj03patil@gmail.com

Received: 11 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 26 October, 2023

स्वातंत्र्याची आस सर्वसामान्यांच्या मनात जागवणारा सनदशीर मार्ग म्हणजे सत्याग्रह होय. म. गांधी यांनी भारतीय जनतेच्या मनसत लढण्याची जिद्द निर्माण करून इंग्रजांना देशाबाहेर जाण्यास भाग पाडले ते याच शस्त्राचा वापर करून. अहिंसात्मक मार्गाने स्वतंत्र होणारा भारत हा जगातील मोठा लोकशाही प्रधान देश आहे. दीडशे वर्षाची इंग्रजी राजवट इथल्या सामान्य जनतेला हाताशी धरून उलथून टाकण्यात गांधीजी यशस्वी ठरले आहेत. स्वातंत्र्य संग्रहातील त्यांचे योगदान वादातीत आहे. विलायतेतून बॅरिस्टर होऊन ते दक्षिण आफ्रिका मार्गे भारतात परतले. येथील जनतेच्या मनात स्वातंत्र्याचे बीज त्यांनी पेरले आणि स्वदेशी, अहिंसा, सत्याग्रह, सविनय कायदेभंग, असहकार अशा सनदशीर मार्गाचा अवलंब करून रक्तरंजित क्रांतीशिवाय स्वातंत्र्य मिळविणे शक्य असल्याचे संपूर्ण जगाला दाखवून दिले. इथे सत्याग्रहाचे स्वरूप, भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न करू.

**महत्वाचे शब्द:** महात्मा, गांधी, गांधी प्रणीत विचार, सत्याग्रह, स्वातंत्र्य

## उद्दिष्टे

१. सत्याग्रहाचे स्वरूप अभ्यासणे.

२. सत्याग्रहाचा सनदशीर मार्ग विचारात घेणे.

३. सत्याग्रहाची उपयुक्तता समजून घेणे.

४. सत्याग्रहाचे प्रासंगिक मूल्य विचारात घेणे.

### गृहितके

१. म. गांधी यांनी व्यक्तिगत आणि सामूहिक जीवनात सर्वोत्तम आचरण मूल्य म्हणून सत्याग्रहाचा अवलंब केला आहे.

२. समकालीन सर्व सामान्य जनतेच्या मनात स्वातंत्र्याचे स्फुलिंग चेतवून सत्याग्रहाच्या मार्गाने इंग्रजांशी लढा देण्यास प्रेरित केले आहे.

३. आजही सनदशीर मार्गाचा अवलंब करून योग्य मागण्यांसाठी सत्याग्रहाचा वापर होत असल्याचे दिसते.

### सत्याग्रहाचा जन्म

'आत्मिक बळाने अन्यायाशी झगडून मरणाची सुद्धा भीती न बाळगता सत्याची बाजू सांभाळणे' (मराठी शब्दरत्नाकर - पृ. ५८३) अशी मराठी शब्दकोशात व्याख्या दिकेली आहे. अन्यायशी लढणे म्हणजे सतत हातात शस्त्र घेतलाच पाहिजे असा नसून संयत पद्धतीनेही विरोध करता येतो हे सत्याग्रहाचे दाखवून दिले आहे. जे मला शक्य आहे ते कोणालाही शक्य आहे, ही त्यांच्या विचार व कार्यामागील महत्त्वाची भूमिका होती. मृत्यूचे भय न बाळगता कोणताही दबावाला बळी न पडता सत्याग्रहाचे पालन करणे हे अत्यंत जिकरीचे काम होते.

गांधीजींनी सत्याग्रहाची सुरुवात दक्षिण आफ्रिकेत झाल्याचे म्हटले आहे. आफ्रिकेत राहणाऱ्या हिंदी जमातीवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनी ट्रान्सवाल मध्ये १९०६ साली लढा उभारला. हा तेथील प्रशासनाविरुद्ध दिलेला लढा होता. 'सद' आणि 'शुभ' यासाठी आग्रह धरणे म्हणजे सत्याग्रह करणे होय. असे त्यावेळी त्यांनी नमूद केले. यात शांती कायम टिकून राहणे शक्य आहे असेही यावेळी नमूद केले होते.

आपल्या सनदशीर मागण्यासाठी अहिंसात्मक मार्गाने प्रयत्न करणे त्यासाठी वाट्टेल ते सोसणे, हिंसेला अहिंसेच्या मार्गाने उत्तर देणे असे यात अभिप्रेत आहे. सत्याग्रहाच्या यशस्वी प्रयोगामुळे विरोधकांचे मत परिवर्तन होणे शक्य आहे असेही नमूद केले आहे.

### सत्याग्रहाचा प्रारंभ स्व पासूनच

गांधीजींनी आपल्या व्यक्तिगत जीवनात सत्याग्रहाचा अंगीकार केला होता. याबाबत गांधीजींनी प्रसंग सांगितला आहे. कस्तुरबा यांना कसलासा आजार झाला होता. गांधीजीनी बरे वाटावे म्हणून त्यांना कडधान्य आणि मीठ सोडण्यास सांगितले. शिवाय मीठ सोडणे किती आवश्यक आहे हे पुस्तकांच्या आधारे समजावून ही सांगितले. पण कस्तुरबा त्यासाठी तयार नव्हत्या. त्यांच्या मते खुद्द गांधीजी ही ते सोडणार नाहीत. अखेर गांधीजींनी स्वतःच ते सोडण्याचा निश्चय केला. कडधान्य आणि मीठ त्यांनी एक वर्ष भरा साठी सोडला. कस्तुरबांनी ते सोडण्याची वाट न पाहता गांधीजींनी ते सोडले शिवाय आफ्रिकेतील वास्तव्यात इतरांवरही हा प्रयोग यशस्वीपणे केला.

गांधीजींनी आपल्या आयुष्यात सतत सत्याचा आग्रह धरला आहे. स्वतःची कामे स्वतः करावीत, प्रत्येकाला बरोबरीच्या नात्याने वागवावे हे त्यांनी कटाक्षाने पाळले. आपल्या अर्ध्या अधिक देशबांधवांना अंगभर कपडे नाहीत म्हणून त्यांनी आपल्या अंगावरील कपड्यांचा त्याग केला. आयुष्यभर एका पंचावर ते राहिले. स्वतःला हवी असणारे कपडे ते स्वतःच विणत असत. सतत स्वदेशी वस्तूंचा वापर केला. एक व्यक्ती म्हणून त्यांचे आचरण जितके सत्याशी धरून होते तितकेच ते आदर्श ही होते, यात शंकाच नाही.

**स्वातंत्र्याचे आत्मभान जागवणारे शस्त्र म्हणजे सत्याग्रह**

गांधीजींनी सत्याग्रहास सार्वजनिक मूल्य म्हणूनही स्वीकारले होते. समाज आणि राजकीय सुधारणेचा सनदशीर मार्ग म्हणून त्यांनी सत्याग्रहाचा प्रभावी वापर केला. इंग्रजांच्या राजवटीतून देशाला मुक्त करावयाचे होते. देशात जहालवादी विचारसरणी होती. रक्तरंजित मार्गाने स्वातंत्र मिळवून घ्यावे असा विचार करणारी क्रांतिकारक मंडळी होती. अशा वातावरणात गांधीजींनी सत्याग्रहाच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवावे असा विचार पुढे आणला. विरोधक संपविण्यापेक्षा मनातील विरोधी भावना संपवावी अशी त्यांची धारणा होती. देशातील भुकेकंगाल सामान्य जनतेला स्वातंत्र्य लढ्यात सहभागी करून घ्यावे असा उदात्त हेतू त्यामागे होता. चंपारण्य सत्याग्रह हा लोक सहभागाचा उत्तम नमुना म्हणता येईल.  सन १९१७ साली शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीत एक तृतीयांश भागात निळ पिकवणे बंधनकारक होते. याल 'तीनकठिया' म्हणत. (आत्मकथा संक्षिप्त-पृ. २०९) हा सरकारी कायदा निश्चित अन्यायकारक होता. तेथील शेतकऱ्यांना हा कायदा मान्य नव्हता. निळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना एकत्र करून इंग्रजी राजवटीविरुद्ध सत्याग्रहाच्या मार्गाने गांधीजींनी लढा उभारला आणि निळ पिकविण्याच्या जाचातून शेतकऱ्यांना मुक्त केले. भारतीय राजकारणातील ही मोठी घटना होती. सशस्त्र इंग्रजांच्या विरुद्ध निःशस्त्र भारतीय जनता असा हा लढा होता. सनदशीर मार्गाने सत्याग्रहाचा अवलंब करून गांधीजींनी हा लढा यशस्वी केला.

दांडी यात्रा काढून केलेला मिठाचा सत्याग्रह, खेड जिल्ह्यातील सत्याग्रह अशा कितीतरी सत्याग्रहाची सुरुवात गांधीजींनी केली. केवळ आत्मिक बळावर सर्व सामान्य लोकांच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत पेटविण्याचे कार्य गांधीजींनी केले.

म. गांधी यांच्या लेखी सत्यास ईश्वराइतके महत्त्व होते. सत्यमय होण्यास अहिंसा हाच एक मार्ग आहे असे त्यांना मनोमन पटले होते. सर्वव्यापी सत्य नारायणाच्या दर्शनासाठी जीव, प्राणिमात्रांवर प्रेम करणे अत्यंत आवश्यक आहे यावर त्यांची ठाम निष्ठा होती. याच सत्याच्या उपासनेमुळे ते राजकारणात ओढले गेले. आत्मशुद्धी खेरीज जीव मात्रा बरोबर ऐक्य साधता येत नाही, याची गरज त्यांनी जणली होती. परिणामी शर्थीचे ओके प्रयत्न करून त्यांनी आपल्या व्यक्तिगत जीवनात सत्य, अहिंसा, सत्याग्रहाचे आचरण केले. हा मार्ग अत्यंत कठोर आहे याची जाणीव त्यांना होती. एका व्यक्तीला वाटणारे महत्त्व इतरांना वाटेलच असे नाही. तरीही गांधीजींनी आपल्या हृदयातील अपार करुणा, अहिंसा, सत्याचा आग्रह साऱ्या जगाला शिकविण्यात यशस्वी झाले. ते स्वतः अंतर्बाह्य शुद्ध होते. शस्त्र युद्धाने सारे जग जिंकण्यापेक्षा

माणसांची मने जिंकली तर आपोआप जग जिंकता येईल यावर त्यांची धारणा होती. विरोधक संपाविण्यापेक्षा त्याच्या मनातील विरोधाची भावना नष्ट करण्यावर म. गांधी यांचा विशेष भर होता. ही बाब जगाने स्वीकारली आहे.

गांधीजींनी संपूर्ण आयुष्यभर आपल्या व्यक्तिगत जीवनात सत्याचे निष्ठेने पालन केले. त्यालाच ते सत्याचे प्रयोग म्हणत. जे मला शक्य आहे ते जगातील कोणत्याही व्यक्तीला शक्य आहे, यावरही त्यांचा विश्वास होता. आपण निवडलेला सत्याचा मार्ग तो केवळ मीच सांगत नसून आपल्या भारतीय संस्कृतीचा तो अविभाज्य अंग आहे. परंपरेने ते आपल्या पर्यंत आले, तेच मी आचरणात आणले असे ते कृतज्ञता पूर्वक मान्य करतात. आधुनिक काळात सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर इतका प्रगाढ विश्वास असणारा दुसरा माणूस सापडणे कठीण आहे. सत्याग्रहाचा वापर त्यांनी केवळ राजकारणात केला नाही तर वैयक्तिक जीवनात आत्मशुद्धीसाठी ही त्यांचा प्रभावी वापर केला. भविष्यात येणाऱ्या पिढ्यांना केवळ अशक्य वाटावे असेच त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. राजकारणात राहून संतपदापर्यंत ते पोहोचले याचे सर्वस्वी श्रेय त्यांच्या विचार आणि कार्यात आहे. म. गांधी यांनी आपल्या शुध्द आचरणातून सत्याचा अंगीकार केला तसाच आग्रहही धरला. सत्याग्रह ही त्यांनी साऱ्या जगाला दिलेली मोठी देणगी आहे. पुढीलप्रमाणे काही निष्कर्ष नोंदवता येतील.

**निष्कर्ष**

म. गांधी यांनी सर्वसामान्य भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची भावना वाढीस लावण्यासाठी सत्याग्रहाचा आग्रह धरला होता. व्यक्तिगत आणि सामूहिक जीवनात आचरणाचे मूल्य म्हणून सत्याग्रहाचा अंगीकार त्यांनी केला हे नाकारता येत नाही. निर्भीडपणे सत्याच्या बाजूने उभे राहणे असे सत्याग्रहाचे साधे पण आचरण करताना तितकेच कठीण वाटणारे सूत्र आहे.

आज संसदीय शासन प्रणालीत जन कल्याणकारी अनेकविध मागण्या मान्य करण्यासाठी सत्याग्रह केला जातो. वेगवेगळया पद्धतींचा अवलंब करून जनता सत्याग्रहाचा आधार घेऊन अन्यायाविरुद्ध आवाज उठवते, हे नाकारता येत नाही. सनदशीर, अहिंसावादी विचाराचा प्रभाव भारतीय जनतेच्या मनावर निर्माण करण्यात म. गांधी प्रणित सत्याग्रहाचे मोलाचे योगदान दिले आहे, हे नाकारता येत नाही.

**संदर्भ सूची**

१. मराठी शब्दरत्नाकर - कै. वा. गो. आपटे - सरस्वती बुक कंपनी, पुणे २ - पुनर्मुद्रण २०१४

२. आत्मकथा संक्षिप्त - गांधीजी नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद - आठवे पुनर्मुद्रण - जुलै २०११

३. वुई द पिपल - नानी पालखीवाला - अनु. वि. स. वाळिंबे - मेहता पब्लिकेशन्स, पुणे - तिसरे पुनर्मुद्रण २००२